# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक : २५६२१११८/१९/२१
फॅक्स : ०२०–२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
ई–मेल : regis@unipune.ac.in

गणेशखिंड,
पुणे–४११००७.

IC/1863

Date : 12/01/2023

प्रति,

**मा.प्राचार्य / मा.संचालक / मा.विभागप्रमुख**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तर विभाग

**विषय:– G-20 शिखर परिषद जनजागृती कार्यशाळेबाबत.**

महोदय / महोदया,

जी–२० शिखर परिषदेचे आयोजन भारत, इटली व इंडोनेशिया या ३ देशात दि. १ डिसेंबर २०२२ ते पुढील १ वर्ष या कालावधीमध्ये करण्यात आलेले आहे. सदर शिखर परिषदेमध्ये जगभरातील ४० देशांचे शिष्टमंडळ व मान्यवर बैठक व चर्चासंत्रामध्ये सहभागी होणार असून त्या निमित्ताने एक वैश्विक विचारमंथन होऊ घातले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये G-20 शिखर परिषदेसंदर्भात जनजागृती कार्यशाळा दि. १४ जानेवारी, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे करण्यात आलेले आहे.

या संदर्भात जनसामान्यांमध्ये तसेच शैक्षणिक परिक्षेत्रातील सन्माननीय प्राचार्य/ संचालक/विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, प्रशासकीय सदस्य व सर्वात महत्वपूर्ण विद्यार्थी यांच्यामध्ये याबाबत जागरूकता निर्माण व्हावी व G-20 या वैशिष्टयपूर्ण आयोजनाचे महत्व समजून यावे याकरीता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे दि. १४ जानेवारी, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता विशेष G-20 कार्यशाळा संपन्न होत आहे. या कार्यशाळेत केंद्र व राज्यशासनाचे श्री. सोलोमोन अरोकीयाराज, सहसचिव, आर्थिक व्यवहार विभाग, भारत सरकार; श्री. विरेंद्र सिंग, सल्लागार, (IER), आर्थिक व्यवहार विभाग, वित्त मंत्रालय, भारत सरकार; श्रीमती. शालिनी आगरवाल, आयुक्त, सुरत महानगरपालिका; श्री.संजय ग्रोवर, शहरी विकास तज्ज्ञ हे तज्ज्ञ अधिकारी मार्गदर्शन करणार आहे.

सदर कार्यशाळेत आपणांसह आपल्या महाविद्यालयातील मा. विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, प्रशासकीय सदस्य, अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थिती सुनिश्चित करावी व त्याबाबतचा संक्षिप्त अहवाल intcent@unipune.ac.in या मेल आयडीवर प्राधान्याने पाठवण्यात यावा.

(डॉ.प्रफुल्ल पवार)
कुलसचिव